महाराष्ट्र विधानसभा
दिवसाच्या कामकाजाचा क्रम
गुरुवार, दिनांक २५ जुलै, २०१३
(सकाळी ११.०० वाजता)

एक : प्रश्नोत्तरे.

(अ) अल्पसूचना प्रश्न

"माहिजळगाव (ता.कर्जत, जि.अहमदनगर) येथे नरेगा या योजनेच्या कामकाज करणाऱ्या तीन कामगारांचा विहीरीची दरड कोसळून मृत्यू झाल्याची घटना" या विषयावरील **प्रा. राम शिंदे, वि.स.स.** यांचा अल्पसूचना प्रश्न क्रमांक ११६८४७.

(ब) गुरूवार, दिनांक १८ जुलै, २०१३ रोजी उत्तरीत झालेल्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील मा. अध्यक्षांच्या निदेशानुसार राखून ठेवण्यात आलेला **श्री. चंद्रदीप नरके, वि.स.स.** यांचा तारांकित प्रश्न ११२१२९ **"कोल्हापूर जिल्ह्यातील विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीची रक्कम थकित राहिलेबाबत".**

(क) तारांकित प्रश्न.

दोन : अशासकीय विधेयके व ठराव समितीचे प्रतिवृत्त सादर करणे.

तीन : विशेषाधिकार भंगाच्या सूचना - (असल्यास) (म.वि.स.नियम २७३ अन्वये).

चार : स्थगन प्रस्तावाच्या सूचना - (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये).

पाच : औचित्याचे मुद्दे - (असल्यास)

सहा : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-

(१) सर्वश्री देवेंद्र फडणवीस, सरदार तारासिंह, गोपाळ शेट्टी, योगेश सागर, **वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"महाराष्ट्र शासनाने सन १९८६ साली म्हाडा अधिनियम, १९७६ मध्ये सुधारणा करून नवीन चॅप्टर '८ ए' अंतर्भूत करण्याचा निर्णय घेतला असणे, सदर कायद्यांतर्गत मुंबई शहर जिल्ह्यातील 'अ' वर्गातील उपकर प्राप्त इमारतीतील ज्या भाडेकरुंच्या गृहनिर्माण संस्था अर्ज करतील त्यांना त्यांची इमारत संपादित करून मालकी तत्वावर देण्याचे प्रयोजन होणे, सदर कायद्यामुळे उपकरप्राप्त इमारतीतील भाडेकरुंचे भविष्य सुरक्षित होण्याच्या दृष्टीने एक चांगली सुरुवात होणे, परंतु मा.मुख्यमंत्री महोदयांनी सदर कायदा आणून २७ वर्ष होऊन गेली असतानाही एकही भाडेकरुंची गृहनिर्माण संस्था त्यांच्या इमारतीचा पुनर्विकास करू न

शकणे, शेकडो गृहनिर्माण संस्थांमधील हजारो भाडेकरु सदर योजनेमध्ये अर्ज करून फसणे, ज्या भाडेकरुंच्या संस्थांना त्यांच्या इमारतीचा मालकी ताबा मिळालेला आहे. त्यांना त्यांच्या इमारतीचा देखभाल स्वखर्चाने करावा लागणे, सध्याच्या अत्यंत महागाईच्या काळात या इमारतीत राहणाऱ्या भाडेकरूंना देखभाल स्वखर्चाने करणे परवडत नसणे, त्यामुळे प्रत्येक भाडेकरुंच्या गृहनिर्माण संस्थांनी '८ ए' अंतर्गत अर्ज केले परंतु सदर योजनेतील भाडेकरूंनी अर्ज मागे घेण्याची इच्छा व्यक्त करणे, प्रॉपर्टी ओनर्स असोसिएशनतर्फे करण्यात आलेल्या न्यायालयीन प्रकरणामुळे सदर योजना गेली अनेक वर्षे रखडणे, त्यामुळे २७ वर्षांनंतर सदर योजनेंतर्गत अर्ज केलेल्या भाडेकरुंची स्थिती अतिशय बिकट असणे, रहात्या इमारतींची पडझड झालेली असल्यामुळे इमारती कोसळण्याची भाडेकरूंच्या मनात भीती निर्माण होणे, कित्येक भाडेकरुंनी आपला जीव वाचविण्यासाठी रहाते घर विकून रस्त्यावर येणे, राज्य शासनाने याच उपकरप्राप्त इमारतीतील भाडेकरुंसाठी स्वतःचे मालकी तत्वाचे घर काहीही स्वखर्च न करता मिळण्याकरिता सुधारीत विकास नियंत्रण नियमावली ३३ (७) व ३३ (९) घोषित करणे, ज्या भाडेकरुंनी सदर योजनेंतर्गत जाण्याचा मार्ग स्विकारला त्यांना फायदा होऊन मालकी तत्वावर २२५/३०० चौ.फुटांच्या निवासी सदनिका मोफत मिळणे, परंतु जे भाडेकरु राज्य शासन व म्हाडावर अवलंबून राहिले व चॅप्टर '८ ए' अंतर्गत भूसंपादन योजनेंतर्गत गेले त्यांचे भविष्य उध्वस्त होणे, त्यामुळे म्हाडा अधिनियम, १९७६ मधील चॅप्टर '८ ए' अंतर्गत अर्ज करून फसलेल्या भाडेकरुंनी केलेला अर्ज व त्या अनुषंगाने झालेल्या इमारतींच्या संपादनाचा प्रस्ताव मागे घेण्याची शासनातर्फे परवानगी मिळाल्यास ते नव्याने विकास नियंत्रण नियमावली ३३ (७) किंवा ३३ (९) अंतर्गत अर्ज करून त्यांना त्यांच्या स्वतःच्या मालकीचे घर मिळू शकेल अशी मागणी शासनाकडे करणे, सदर भाडेकरु सोसायटीला अर्ज परत करण्यास परवानगी दिल्यास स्वतः भाडेकरू सोसायटीचा विकास करतील या दृष्टीने त्यांना परवानगी देण्याची गरज, परंतु सदर मागणीकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, त्यामुळे मुंबईतील उपकरप्राप्त इमारतीतील भाडेकरुंच्या मनात शासनाविषयी असंतोषाची व चिडीची भावना निर्माण होणे, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व करावयाची कार्यवाही."

(२) **प्रा.वीरेंद्र जगताप, वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **जलसंधारण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"माहे डिसेंबर, २०१२ पासून विदर्भातील एकूण ८ जिल्ह्यांसाठी रुपये ३२०० कोटी तरतुदीच्या विदर्भ सघन सिंचन विकास कार्यक्रमांतर्गत अत्यंत अल्प निधी खर्ची घालण्यात आल्याचे निदर्शनास येणे, या कार्यक्रमामध्ये अमरावती विभागातील ५ व नागपूर विभागातील ३ जिल्ह्यांचा समावेश असणे, या कार्यक्रमांतर्गत सदर ८ जिल्ह्यांसाठी ५ वर्षांकरीता रु.३२०० कोटींची तरतूद असणे, परंतु माहे डिसेंबर, २०१२ पासून ६ महिन्यांमध्ये अमरावती विभागात फक्त रु.१३ कोटी तर अमरावती जिल्ह्यात केवळ रु.२.५० कोटी निधी खर्च करण्यात येणे, कार्यकारी यंत्रणेकडील अनेक रिक्त पदांची संख्या व यंत्रणेकडे पुरेशी वाहने उपलब्ध नसल्याने अंमलबजावणीत अडचण निर्माण होणे, तसेच कामांना प्रचंड वाव असताना प्रकल्पांच्या मापदंडांमध्ये सुधारणा, ७० हजार प्रति हेक्टर दुरुस्ती कामांच्या मापदंडांमध्ये सुधारणा, पाणी उपलब्धता प्रमाणपत्राची अट शिथिल करण्याची आवश्यकता असणे, सदर महत्वाकांक्षी कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याने विदर्भावर होत असलेला

अन्याय, यामुळे विदर्भातील शेतकरी बांधवांमध्ये पसरलेले तीव्र असंतोषाचे वातावरण, त्यामुळे विभागांतर्गत रिक्त पदे तातडीने भरणे, पुरेशी वाहने उपलब्ध करून देणे व योजनेच्या मापदंडात आवश्यक सुधारणा तसेच पाणी उपलब्धता प्रमाणपत्राची अट शिथिल करण्याची आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(३) **सर्वश्री जितेंद्र आव्हाड,** विलास लांडे, लक्ष्मण जगताप, बापूसाहेब पठारे, **वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"राज्यात विद्यार्थी परिषदेच्या निवडणुका घेण्यास घातलेली बंदी उठविण्यासाठी तत्कालीन निवडणूक आयुक्त लिंगडोह यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीने आपला सकारात्मक अहवाल शासनास सादर केलेला असणे, त्याचबरोबर कुलगुरु राजन वेळुकर यांच्या समितीनेही आपला अहवाल सादर केलेला असताना यासंदर्भात निर्णय घेतला जात नसणे, त्यामुळे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये असलेली अन्यायाची भावना, सद्य:स्थितीत सामाजिक क्षेत्रात भरीव काम करीत असलेल्या व्यक्तींनी विद्यार्थीदशेतूनच आपल्या व्यक्तिमत्वाचा विकास साधलेला असताना महाविद्यालयीन पातळीवर निवडणुकांनाच बंदी घालण्यात आलेली असल्याने विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचा विकास खुंटलेला असणे, त्यांच्या कलागुणांना वाव मिळावा, राजकीय क्षेत्रात अभ्यासू, संवेदनशील व्यक्तींकडून सर्वसमावेशक धोरणे तयार करून सामाजिक उन्नतीसाठी प्रयत्न व्हावेत यासाठी राज्यातील लोकप्रतिनिधी, महाविद्यालयीन विद्यार्थी संघटना, सामाजिक संस्थांनी मा.मुख्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांचेकडे दिनांक १६ जुलै, २०१३ रोजी तसेच अलिकडील काळात वारंवार मागणी केलेली असतानाही सदर गंभीर प्रकरणी आवश्यक कार्यवाही करण्यास होत असलेली दिरंगाई, याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, महाविद्यालयीन स्तरावर निवडणुकांना बंदी घालण्यात आलेली असल्याने विद्यार्थ्यांना निवडणुकीसारख्या क्षेत्रापासून वंचित रहावे लागत असणे, महाविद्यालयीन स्तरावरील निवडणुका त्वरेने सुरु करण्यासाठी शासनाने वेळीच हस्तक्षेप करून तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(दुपारी १.३० ते २.०० वाजेपर्यंत- मध्यंतर)

सात : **सर्वश्री एकनाथराव खडसे-पाटील, सुभाष देसाई, गणपतराव देशमुख, बाळा नांदगांवकर, सुधीर मुनगंटीवार, गिरीष बापट, रविंद्र वायकर, देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे, नाना पटोले, विनोद घोसाळकर, नितीन सरदेसाई, श्रीमती मिनाक्षी पाटील, सर्वश्री मंगलप्रभात लोंढा, गोपाळ शेट्टी, सरदार तारासिंह, कुमार आयलानी, योगेश सागर, श्रीमती माधुरी मिसाळ, सर्वश्री प्रविण दरेकर, शिशिर शिंदे, विवेक पंडित, रविंद्र चव्हाण, भिमराव तापकीर, मंगेश सांगळे, प्रताप सरनाईक, राजन विचारे, प्रकाश शेंडगे वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :**

"मुंबईतील धारावी पुनर्विकास योजनेसाठी शासनाने मंजूर केलेले ४ चटईक्षेत्र व रहिवाशांनी ४०० चौ. फुटांचे घर देण्याची मागणी, मुंबईतील विमानतळाभोवतालची २७६ एकर जमीन ८५ हजार झोपड्यांनी व्यापल्यामुळे सुरक्षेचा व त्यांच्या पुनर्वसनाचा निर्माण झालेला प्रश्न,

सन २०११ च्या अखेरपर्यंत विकासक एचडीआयएला दिलेल्या ३० ते ४० दशलक्ष चौ.फूट टीडीआरपैकी १.२ दशलक्ष चौ.फूट टीडीआरचा वापर करुनही केवळ २७ हजार २१६ झोपडपट्टीवासीयांचे पुनर्वसन होऊन उर्वरित झोपडपट्टीवासीयांच्या पुनर्वसनाचा प्रश्न प्रलंबित असणे, म्हाडाच्या ५६ वसाहतींचे पुनर्वसन व सोसायट्यांचे अभिहस्तांतरण याबाबत शासनाची उदासीन भूमिका व ते भ्रष्टाचारी अधिकाऱ्यांमुळे खोळंबून राहणे, मुंबईतील मिठी नदीचे रखडलेले काम व वाढणाऱ्या अनधिकृत कामाकडे एमएमआरडीएने केलेले अक्षम्य दुर्लक्ष, मुंबईतील मोनो व मेट्रो प्रकल्प तसेच पश्चिम रेल्वे द्रुतगती मार्ग (चर्चगेट ते विरार) हा उन्नत मार्ग पूर्ण होण्यात होत असलेला विलंब, तसेच एमएमआरडीए व एमएसआरडीसी यांच्या सुरु असलेल्या प्रकल्पांची अपूर्ण कामे व बांधलेल्या उड्डाण पुलांची दुरावस्था, मध्य वैतरणा धरणाच्या खोडाळा पुलाचे काम अपूर्ण असल्यामुळे पाणी साठवणुकीत निर्माण झालेल्या अडचणी, मुंबई, ठाणे व पुणे परिसरात एप्रिल २०१३ मध्ये मुंब्रा, शीळफाटा येथील इमारत दुर्घटनेमध्ये ७४ जणांचा बळी जाऊनही जून महिन्यापासून दि.१४ जुलै २०१३ पर्यंत माहिम, दहिसर, मुंब्रा, भिवंडी, ठाणे, ॲन्टॉप हिल, मुंबई आणि नालासोपारा अशा विविध ठिकाणी विकासक, बांधकाम व्यावसायिक, भू माफिया, शासन व महापालिकांचे संबंधित अधिकारी यांच्या संगनमताने अनधिकृतपणे बांधलेल्या अथवा मोडकळीस आलेल्या इमारती आणि झोपड्या कोसळून ३६ हून अधिक जण ठार होऊन झालेली जिवित व वित्त हानी, बृहन्मुंबईत सुमारे ३२७ ठिकाणांवर असलेल्या झोपड्यांना दरडीचा धोका असून अनेक ठिकाणी दरडी कोसळण्याच्या घटनादेखील घडलेल्या असणे, तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या क्षेत्रात असलेल्या खाडीलगतच्या तिवरांची कत्तल करुन मोठ्या प्रमाणात मातीचा भराव टाकून राजकीय आशीर्वादाने अनधिकृतपणे सुरु असलेली बांधकामे, मोडकळीस आलेल्या इमारती अथवा झोपड्यांमधील रहिवाशांना सुरक्षित ठिकाणी हलविण्यात अथवा पाठविण्यात येणाऱ्या संक्रमण शिबिरात योग्य त्या सोयीसुविधांचा अभाव असल्यामुळे अशा धोकादायक इमारती व चाळीमधील रहिवाशांकडून त्या खाली करुन देण्यास होत असलेला नकार, परिणामी शासन अवैध बांधकाम व मोडकळीस आलेल्या इमारतींमध्ये राहणाऱ्या रहिवाशांच्या संदर्भात गंभीर नसल्यामुळे भ्रष्ट अधिकारी व विकासक यांच्या संगनमताने बेकायदा बांधकामे वाढीस लागणे, तसेच काही ठिकाणी विकासकाचे हित जपण्यासाठी मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार व भ्रष्टाचार करुन अनधिकृत बांधकामे व अतिक्रमणांना संरक्षण देणाऱ्या संबंधित अधिकारी, अभियंता, आर्किटेक्ट आणि इमारत मालकांवर कारवाई करण्यास शासनाला आलेले अपयश, दुर्घटनाग्रस्त इमारती व झोपड्यातील मृत अथवा जखमी झालेल्या व्यक्तींच्या नातेवाईकांना देण्यात येणाऱ्या आर्थिक मदतीमध्ये शासनाकडून करण्यात येत असलेला दुजाभाव, परिणामी अशा अनधिकृत व मोडकळीस आलेल्या इमारतीमध्ये राहणाऱ्या जनतेमध्ये निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने अशा अनधिकृत इमारती अथवा मोडकळीस आलेल्या इमारतीत राहणाऱ्या रहिवाशांसंदर्भात धोरणात्मक निर्णय घेऊन अशा अनधिकृत बांधकाम प्रकरणी जबाबदार असलेल्या तत्कालीन संबंधित महापालिकेच्या अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करुन त्यांच्यावर व संबंधित विकासक व झोपडपट्टीदादांवर कठोर कारवाई करण्याची व त्यासंबंधी असलेल्या कायद्याची कठोरपणे अंमलबजावणी करण्याची व मुंबईत प्रलंबित असलेल्या विविध एस.आर.ए. व पुनर्विकासाच्या प्रकल्पांबाबत शासनाचे धोरण निश्चित करुन नागरिकांना भेडसावत असलेल्या विविध समस्यांवर योग्य त्या उपाययोजना करण्याची आवश्यकता".

आठ : शासकीय विधेयके :-

(१) विचार पुढे सुरु, खंडश: विचार व संमत करणे :-

विधानपरिषदेने संमत केलेले सन २०१३ चे विधानपरिषद विधेयक क्रमांक २ - महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०१३.

---

(२) विचार, खंडश: विचार व संमत करणे :-

(क) **भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ (२) (अ) आणि महाराष्ट्र विधानसभा नियम १५९ (२) अन्वये सर्वश्री एकनाथराव खडसे, देवेंद्र फडणवीस, सुधीर मुनगंटीवार, महादेव बाबर, सुभाष देसाई, सुरेश हाळवणकर, विवेक पंडित, गोपाळ शेट्टी, योगेश सागर, सरदार तारासिंह, गिरीश बापट, श्रीमती माधुरी मिसाळ, सर्वश्री भिमराव तापकीर, विवेक पाटील, श्रीमती मीनाक्षी पाटील, सर्वश्री धैर्यशील पाटील, प्रताप सरनाईक, एकनाथ शिंदे, रुपेश म्हात्रे, राजन विचारे, डॉ.बालाजी किणीकर, सर्वश्री ज्ञानराज चौगुले, विजयराज शिंदे, संतोष सांबरे, चंद्रकांत मोकाटे, विजय शिवतारे, शरद पाटील, राजेश क्षीरसागर, डॉ.सुजित मिणचेकर, श्री.चिमणराव पाटील, श्रीमती मिराताई रेंगे-पाटील, सर्वश्री रविंद्र वायकर, विनोद घोसाळकर, प्रकाश (बाळा) सावंत, भरतशेठ गोगावले, सदानंद चव्हाण, डॉ.खुशाल बोपचे, श्री.नाना पटोले, डॉ.सुधाकर भालेराव, श्रीमती पंकजा मुंडे-पालवे, सर्वश्री.प्रकाश शेंडगे, प्रमोद जठार, रविद्र चव्हाण प्रविण दरेकर, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"ही विधानसभा सन २०१३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १३- महाराष्ट्र कृषि, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था व अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम (प्रतिबंध) अध्यादेश, २०१३ नापसंत करते."

(ख) **सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २७ - महाराष्ट्र कृषि, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था व अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम (प्रतिबंध) विधेयक, २०१३.**

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.देवेंद्र फडणवीस, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २७ - महाराष्ट्र कृषि, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था व अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम (प्रतिबंध) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.महादेव बाबर, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २७ - महाराष्ट्र कृषि, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था व अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम (प्रतिबंध) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(च) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.प्रकाश शेंडगे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २७ - महाराष्ट्र कृषि, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था व अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम (प्रतिबंध) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३०१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(छ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.चंद्रशेखर बावनकुळे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २७ - महाराष्ट्र कृषि, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था व अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम (प्रतिबंध) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१७ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ज) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री नानाजी शामकुळे, विजय घोडमारे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २७ - महाराष्ट्र कृषि, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था व अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम (प्रतिबंध) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २०१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(झ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री सुर्यकांत दळवी, सदानंद चव्हाण, भरतशेठ गोगावले, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २७ - महाराष्ट्र कृषि, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था व अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम (प्रतिबंध) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ८१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ट) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.विवेक पंडित, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २७ - महाराष्ट्र कृषि, पशु व मत्स्य विज्ञान, आरोग्य विज्ञान, उच्च, तंत्र व व्यवसाय शिक्षण यांमधील अनधिकृत संस्था व अनधिकृत अभ्यास पाठ्यक्रम (प्रतिबंध) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ५५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

नऊ : अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) :-

गत सत्रातील प्रलंबित : (सूचना क्र. १ ते ४)

(१) श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.

"शिक्षणापासून कोणीही वंचित राहू नये आणि शिक्षणाचे सार्वत्रीकरण व्हावे या मूळ उद्देशातून राबविण्यात येत असलेले सर्व शिक्षा अभियान यशस्वी करण्यासाठी करार कर्मचारी विषयतज्ञ (साधनव्यक्ती) यांनी अहोरात्र परिश्रम घेणे, राज्यभरात या योजनेअंतर्गत कंत्राटी पध्दतीने सुमारे २० हजार कर्मचारी कार्यरत असणे, राज्यात कंत्राटी पध्दतीने ६-६ महिने कालावधीत एक दिवसाचा तांत्रिक खंड देऊन सदर कर्मचारी गत १२ वर्षांपासून कार्यरत असणे, या कंत्राटी कर्मचाऱ्यांना शासन सेवेत सामावून घेण्याबाबतची मागणी प्रलंबित असणे,राज्यातील सर्व करार कर्मचारी हे उच्च शैक्षणिक अर्हताधारक असून कामाचा प्रदीर्घ अनुभव त्यांना असणे, सदर करार कर्मचाऱ्यांची नियुक्ती गुणवत्ता तसेच बिंदुनामावली नुसार शासकीय भरती प्रक्रियेच्या विहित नियमावलीप्रमाणे जिल्हा निवड समितीमार्फत विविध पदांवर करण्यात येणे, राज्यातील बऱ्याच सुशिक्षितांनी या प्रकल्पात काम करताना शासकीय सेवेसाठीची विहित वयोमर्यादा ओलांडणे, केंद्र शासनाने प्रसिध्द केलेल्या अहवालानुसार सर्व शिक्षा अभियानातील उत्तम कार्याबद्दल महाराष्ट्र हे देशातील तिसऱ्या क्रमांकाचे राज्य असल्याचे जाहीर असणे, या कंत्राटी कर्मचाऱ्यांना शासन सेवेत सामावून घेण्याच्या मागणीकडे राज्य शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष."

(२) श्री. संजय भेगडे, वि.स.स. पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.

"महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी नियुक्त्या करण्यात आलेल्या ग्रामरोजगार सेवकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागणे, कृषी पदवी, पदविका उत्तीर्ण तसेच उच्चशिक्षित असलेल्या ग्रामरोजगार सेवकांना अत्यल्प वेतनावर काम करावे लागणे, नियोजन विभागाच्या दिनांक २ मे २०११ च्या शासन निर्णयामध्ये ग्रामरोजगार सेवकांचे काम अर्धवेळ स्वरूपाचे असेल असे नमूद असतानाही त्यांना रात्रंदिवस काम करावे लागणे, वाढत्या महागाईच्या काळात त्यांना केवळ सव्वादोन टक्के कमिशनवर कुटुंबाची गुजराण करावी लागणे व त्यांना आर्थिक हालअपेष्टांचा सामना करावा लागणे, त्यांना त्यांच्या शैक्षणिक योग्यतेनुसार शासनसेवेत सामावून घेण्यात यावे या व अन्य मागण्या

शासनदरबारी प्रलंबित असणे, शासनाचे याकडे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही."

(३) **श्री. सुधीर मुनगंटीवार, वि.स.स.** पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.

"अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे विभाजन करुन पूर्व विदर्भासाठी चंद्रपूर जिल्ह्यातील मुल येथे कृषी विद्यापीठ स्थापन करण्याची नितांत आवश्यकता, कृषी विद्यापीठाच्या स्थापनेच्या दृष्टीने मुल तालुक्यात सर्व अनुकूल बाबी उपलब्ध असणे, अमरावती आणि नागपूर विभागातील पीक पद्धती वेगवेगळी असणे, त्यामुळे निर्माण झालेला असमतोल लक्षात घेता नागपूर विभागात पूर्व विदर्भासाठी कृषी विद्यापीठ स्थापन करणे गरजेचे असणे, पूर्व विदर्भातील धान उत्पादक प्रदेशामध्ये हे कृषी विद्यापीठ स्थापन झाल्यास शेतकऱ्यांच्या जीवनात नवे परिवर्तन घडणार असल्याने अकोला येथील पंजाबराव कृषी विद्यापीठाचे विभाजन करुन पूर्व विदर्भात मुल येथे कृषी विद्यापीठ स्थापन करण्याची गरज, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही."

(४) **श्री.नानाजी शामकुळे, वि.स.स.** पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.

"चंद्रपूर जिल्ह्यातील वाढत्या औद्योगिकरणामुळे चंद्रपूर जिल्हा प्रदुषणात देशात चौथ्या क्रमांकावरुन पहिल्या क्रमांकावर आलेला असणे, प्रदुषणामुळे येथील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आलेले असणे, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने ठरवून दिलेल्या नियमांचे उद्योजकांकडून उल्लंघन होत असल्यामुळे प्रदुषणात दिवसेंदिवस भर पडत असणे, सांडपाणी व्यवस्थापन होत नसल्यामुळे दूषित पाणी रस्त्यावर येवून लगतच्या शेतात व नाल्यात जात असणे, जड वाहनांकरिता ठरवून दिलेल्या नियमांचे सर्रास उल्लंघन होत असल्यामुळे ग्रामीण व शहरी भागात प्रदुषणात भर पडत असून रस्ते खराब होत असणे, चंद्रपूर जिल्ह्यातील पदुषणाला आळा घालणे अत्यंत गरजेचे असणे, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची उपाययोजना."

(दिनांक १८ जुलै, २०१३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या, तथापि चर्चा न झालेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) (सूचना क्र. ५ ते ६)

(५) **श्री.विकास कुंभारे , वि.स.स.** पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.

"नागपूर शहरातील मानकापूर उड्डाणपूल बांधण्यासाठी रहदारीसाठी पर्यायी मार्गाची व्यवस्था अद्यापही निर्माण झालेली नसणे, मनिष नगर रेल्वे उड्डाणपुलासाठी स्थापित समितीने विविध पर्यायासह आपला अहवाल शासनास सादर केला असणे, रेल्वे उड्डाणपूल बांधकामास येणारा खर्च सुसाध्यता व अडचणी लक्षात घेता ५ पर्याय अभ्यासाअंती शासनास सादर करताना Twin Cell RCC Box जोड रस्ता बांधण्याचा पर्याय सोईचा असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले असणे, हिंगणा रोडवर अरुंद रस्त्यामुळे वाहतुकीची कोंडी होणे, या रस्त्यावर एम.आय.डी.सी. विविध शाळा, कॉलेज, मेडिकल कॉलेज, सी.आर.पी.एफ, एस.आर.पी.एफ व शहराच्या वाढत्या विस्तारामुळे लगतच्या गावाचे वाढते नागरीकरण यामुळे

वाहतुकीची कोंडी होवून मोठ्या प्रमाणात अपघात घडत असणे, यामुळे हिंगणा रोड टी-पॉईंट ते सी.आर.पी.एफ गेटपर्यंत उड्डाणपुलाची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. "

(६) **श्री. गोवर्धन शर्मा, वि.स.स.** पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.

"विदर्भात राष्ट्रसंताचे समाधी स्थळ असलेल्या गुरुकुंज आश्रमाला रस्त्याच्या चौपदरीकरण व उड्डाणपुलामुळे धोका निर्माण होणे, नागपूर-मुंबई महामार्ग अमरावती जवळील तुकडोजी महाराजांच्या गुरुकुंज आश्रमाला राष्ट्रीय स्मारक घोषित करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(मंगळवार, दिनांक २३ जुलै, २०१३ रोजीच्या बॅलटद्वारे ठरविण्यात आलेल्या प्राथम्यक्रमानुसार दर्शविण्यात आलेल्या सूचना) (सूचना क्र. ७ व ८)

(७) **श्री. सुधाकर देशमुख व इतर वि.स.स.** पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.

"सफाई कामगारांच्या आर्थिक विकासासाठी महर्षी सुदर्शन आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याची आवश्यकता, अनुसूचित जमातीतील भंगी, मेहतर, डोम, डुमार इत्यादी जातींना त्यांचे आराध्य दैवत असलेल्या सुदर्शन समाज या सुधारित नावाने मंजुरी देण्याची आवश्यकता, नियमित आर्थिक विकास महामंडळाला महर्षी सुदर्शन व महर्षी वाल्मिकी यांचे नाव देणे, राज्यातील सर्व महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषदा व अन्य संस्थांमध्ये ऐवजदार, बदली कामगार, रोजंदार, ठेकापध्दती व हजेरी स्वरुपात सफाई कामगारांच्या कल्याणासाठी माथाडी बोर्डासारखे एक स्वतंत्र बोर्ड स्थापित करुन सफाई ही अनिवार्य सेवा असल्याने सफाई कामगार पद निर्माण करण्याकरिता असलेली आस्थापना खर्चाची अट शिथिल करुन आकृतीबंदाची शासकीय मर्यादा रद्द करणे, सफाई सेवेत ठेवा पध्दती पूर्णपणे बंद करुन शासनाच्या लाड समिती व पागे समितीच्या अहवालातील शिफारशींवर त्वरित कार्यवाही करुन शासनाच्या सर्व विभागांमध्ये लागू करण्याची आवश्यकता, असंघटीत कामगार सामाजिक सुधारणा कायदा, २००८ च्या कलम ५ अंतर्गत राज्य सरकाद्वारे बोर्ड त्वरित गठीत करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(८) **श्री विजयराज शिंदे व इतर वि.स.स.** पुढील सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीवर चर्चा उपस्थित करतील.

"राज्यात प्रत्येक जिल्ह्यासाठी एक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय असावे असे शासनाचे धोरण असणे, बुलढाणा जिल्हा सामान्य रुग्णालय हे ३६२ खाटा, स्त्री रुग्णालय १०० खाटा, टी.बी. रुग्णालय २० खाटा, चॅरिटेबल रुग्णालये २५ खाटा असे जवळपास ५०० खाटांचे वर रुग्णालय असताना देखील मागासलेल्या बुलढाणा जिल्ह्यात शासकीय वैद्यकीय

महाविद्यालय नसणे, बुलढाणा जिल्हा सामान्य रुग्णालयात लागून असलेल्या जळगाव, अकोला, जालना व औरंगाबाद या जिल्ह्यातील रुग्ण मोठ्या प्रमाणात उपचारासाठी येणे, तसेच लोकसंख्या ही २५ लक्ष असणे, JNM/ANM या नर्सिंग कोर्सच्या जवळपास ३०० ते ४०० प्रशिक्षणार्थी क्षमतेची प्रशिक्षण केंद्र कार्यरत असणे, जिल्हा सामान्य रुग्णालय येथे सुद्धा ३०० प्रशिक्षणार्थींना नर्सिंग कोर्सचे प्रशिक्षण देण्याची क्षमता असणे, जिल्हा नियोजन समिती, बुलढाणा ही समितीही बुलढाणा येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयास अनुकूल असतानासुद्धा बुलढाणा येथे वैद्यकीय महाविद्यालय नसणे, येथे वैद्यकीय महाविद्यालयात मान्यता देण्यात यावी अशी होणारी मागणी, याकडे शासनाचे होणारे दुर्लक्ष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही तथा उपाययोजना."

विधान भवन,
मुंबई.
दिनांक : २४ जुलै, २०१३.

डॉ. अनंत कळसे,
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.